**सरकार –वि– सनपती तनगुला**

| | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | १५/०१/२०२१ |
| | नोंदणी दिनांक | : | १५/०१/२०२१ |
| | निकाल दिनांक | : | १०/०४/२०२६ |
| | कालावधी | : | व. म. दि.<br>०५ ०२ २६ |

CNR NO.MHGA13-000608-2023. **निशाणी क्र.२९**

**विशेष न्यायालय (पोक्सो कायदा) तथा अतिरीक्त सत्र न्यायाधीश, अहेरी, जिल्हा गडचिरोली येथील न्यायालयात**

**पीठासीन अधिकारी :– ज्ञानेश्वर म. आहेर,**

| | | |
|---|---|---|
| | न्यायनिर्णयाची तारीख :– १०/०४/२०२६<br>**विशेष (पोक्सो) खटला क्र. ७०/२०२३**<br>**(जुना विशेष (पोक्सो) खटला क्र.४/२०२१)** | |
| | प्रथम खबर/गुन्हा क्र. ३१/२०२०<br>सिरोंचा पोलीस स्टेशन | |
| अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र सरकार**<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>सिरोंचा पोलीस स्टेशन, जि. गडचिरोली. |
| प्रतिनिधीत्व करणार | | सरकारी अभियोक्ता श्री. एस.डी. गावडे |
| आरोपी | | **सनपती बकन्ना तनगुला**<br>वय – २९ वर्षे,<br>व्यवसाय – मजुरी,<br>रा. आदिमुत्तापुर, तालुका – सिरोंचा,<br>जिल्हा – गडचिरोली. |
| प्रतिनिधीत्व करणार | | विधीज्ञ श्री.आर.एम. मेंगनवार. |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०७/११/२०१९ |
| प्रथम खबर तारीख | ०१/०३/२०२० |
| आरोपपत्र दाखल केल्याची तारीख | ०५/०१/२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | १५/०२/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख. | ०९/०४/२०२६ |
| ज्या दिवशी न्यायनिर्णय राखून ठेवला आहे, ती तारीख | .... |
| न्यायनिर्णयाची तारीख | १०/०४/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास शिक्षेची तारीख | लागू नाही. |

**आरोपीची माहिती**

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हे दाखल | निर्दोष ठरविले की दोषी ठरविले | ठोठाविलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | सनपती बकन्ना तनगुला | १८/०३/२०२० | १३/०१/२०२१ | बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम १२ व भारतीय दंड संहीतेचे कलम ३५४(ड) अन्वये. | निर्दोष. | लागू नाही. | लागू नाही. |

# न्यायनिर्णय

(दिनांक १० एप्रिल, २०२६ रोजी पारित)

१. आरोपी याचेवर भारतीय दंड संहितेचे कलम ३५४(ड) व बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम १२ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपावरुन संपरिक्षा सुरू आहे.

२. अभियोग पक्षाचे कथन पुढील प्रमाणे आहे. सन २०१९ साली पिडीता ही जिल्हा परिषद शाळा, सिरोंचा येथे इयत्ता नव्वीच्या वर्गात शिक्षण घेत होती. पिडीता ही बालक होती. पिडीता ही तिचे मुळ गावापासुन एस.टी. बसने शाळेत ये-जा करायची. सदर कालावधीत आरोपी हा पिडीतेचा पाठलाग करायचा व तिचा हात धरून तिला त्याचे मोटारसायकलवर बसण्यास आग्रह करायचा. दि. २६.२.२०२० रोजी सकाळी ११.०० चे सुमारास पिडीता हिचे आईवडील घरी नसतांना आरोपी तिचे घराभोवती फिरत होता. दि.१.३.२०२० रोजी पिडीतेने कथीत घटनांबाबत तिचे आई व वडील यांना सांगीतले. त्यानंतर पिडीता हिने आरोपीविरूध्द सिरोंचा पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.

३. उपरोक्त फिर्यादीवरून सिरोंचा पोलीस स्टेशन येथे अप.क्र. क्र.३१/२०२० नोंदविण्यात आला. तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्रीमती शितल धविले यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला, पिडीतेचे जन्म तारखेबाबत कागदपत्रे

हस्तगत केली व आरोपीविरूध्द विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे सुविद्य पुर्वाधिकारी यांनी निशाणी क्र.१४ येथे आरोपीविरुद्ध दोषारोप निश्चित केले. सदरचा दोषारोप आरोपीला त्याचे भाषेत वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबूल केला व संपरीक्षेची मागणी केली. अभियोग पक्षाने पिडीता व तिचे वडील यांची साक्ष नोंदविली. परंतु त्यांनी अभियोग पक्षास समर्थन केले नाही. आरोपीचे विधिज्ञांनी पिडीतेचा जन्म दाखला व घटनास्थळ पंचनामा हे दस्तऐवज मान्य केले.  अश्या परिस्थितीत सुविद्य अतिरीक्त शासकीय अभियोक्ता यांनी अभियोग पक्षाचा पुरावा पुरसीस नि.क्र.२७ अन्वये बंद केला. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये घेतलेल्या तपासणीत त्याने गुन्हा खोटा असल्याचे नमुद केले. आरोपीचा बचावार्थ पुरावा दिलेला नाही.

५. अभियोग पक्षातर्फे सुविद्य अतिरिक्त शासकीय अभियोक्ता श्री. एस.डी. गावडे आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर.एम. मेंगनवार यांचा युक्तीवाद ऐकला.

६. न्यायालयाचे विचारार्थ उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने नोव्हेंबर २०१९ या कालावधीत सिरोंचा बस स्टॅन्ड येथे बालीक पिडीता हिचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने हात पकडुन व वेळोवेळी पाठलाग केला ? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने नोव्हेंबर २०१९ या कालावधीत सिरोंचा बस स्टॅन्ड येथे बालीक पिडीता हिचा हात पकडुन व तिचे इच्छेविरूध्द पाठलाग करून तिचा लैंगीक छळ केला ? | नाही. |
| ३. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत :-**

७. आरोपीविरूध्द अपराध सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने पिडीता सा.क्र.१ (नि.क्र.१८) व पिडीतेचे वडील सा.क्र.२ (नि.क्र.२२) यांची साक्ष नोंदविली आणि पिडीता हिचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (नि.क्र.२४), शाळेतील रजिस्टरचा उतारा (नि.क्र.२५) व घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.२६) हे दस्तऐवज दाखल केले.

**<u>पिडीता हिचे वयाबाबत</u>** :

८. आरोपीचे विधिज्ञांनी मान्य केलेले पिडीता हिचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (नि.क्र.२४) व शाळेतील रजिस्टरचा उतारा (नि.क्र.२५) या नुसार पिडीता हिची जन्म तारीख ३.१०.२००४ अशी आहे. कथीत घटना नोव्हेंबर २०१९ या कालावधीत घडलेली आहे. या वरून हे स्पष्ट होते की, कथीत घटनेवेळी पिडीताचे वय १५ वर्ष होते. म्हणजेच कथीत घटनेवेळी पिडीता ही बालीका होती.

**<u>पिडीता हिचे कथीत लैंगीक छळाबाबत</u>** :

९. पिडीता सा.क्र.१ हिने तिचे पुराव्यात असे म्हटले की, सन २०१९ साली ती जिल्हा परिषद शाळा सिरोंचा येथे शिक्षण घेत होती व तिचे मुळ गावावरून एस.टी. बसने ये–जा करायची. परंतु तिने म्हटले की, त्यावेळी ती घटना घडली नाही व तिची आरोपीविरूध्द कुठलीही तक्रार नाही. तिने तिची फिर्याद नि.क्र.२० व जबाब नि.क्र.२१ यावरील सहया मान्य केल्या, परंतु त्यातील मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविली. तिचे सुविद्य अतिरीक्त शासकीय अभियोक्ता यांनी घेतलेल्या पुढील तपासणीत तिने हे स्पष्टपणे नाकारले की, आरोपी तिचा पाठलाग करायचा व तिचा हात धरायचा. तिने हे मान्य केले की, तिचेत व आरोपीत न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली आहे. अश्याप्रकारे पिडीता सा.क्र.१ हिचे पुराव्यात आरोपीविरूध्द

काहीही आलेले नाही. म्हणुन पिडीता सा.क्र.१ हिचा पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

१०. पिडीतेचे वडील सा.क्र.२ यांनी देखील अभियोग पक्षास समर्थन केलेले नाही. त्यांचे पुराव्यात त्यांनी म्हटले की, पिडीतेने त्यांना सांगीतले की, आरोपी तिला रागावत होता. त्यांनी देखील हे नाकारले की, पिडीतेने त्यांना सांगीतले की, आरोपी तिचा पाठलाग करतो. अश्याप्रकारे पिडीतेचे वडील सा.क्र.२ यांचा पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त नाही.

११. घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२६ यात आरोपीला अपराधात गोवणारे काहीही एक नाही. पिडीता हिचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ अन्वये नोंदविलेला जबाब यातील मजकुर पिडीतेने नाकारला. शिवाय पिडीता हिने न्यायालयासमोर साक्ष देतांना अभियोग पक्षास समर्थन केलेले नाही. त्यामुळे तिचा जबाब नि.क्र.२१ हा परीपूर्ण पुरावा ठरत नाही.

१२. उपरोक्त विवेचनावरून हे स्पष्ट होते की, आरोपीविरूध्द कुठलाही पुरावा नाही. म्हणुन असा निष्कर्ष निघतो की, अभियोग पक्ष हे सिध्द करू शकले नाही की, आरोपीने नोव्हेंबर २०१९ या कालावधीत सिरोंचा बस स्टॅन्ड येथे व पिडीतेचे गावी पिडीता हिचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिचा हाथ धरला व वेळोवेळी तिचा पाठलाग करून तिचा लैंगीक छळ केला. परीणामत: आरोपी त्याचेविरूध्दचे दोषारोपातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र

आहे. म्हणून मुद्दे क्र. १ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहेत. मुद्दा क्र. ३ चे निष्कर्षात खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१) आरोपी याची भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम ३५४(ड) व बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम १२ यातील आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५ अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपीचे बंधपत्र व जामीन रद्द करण्यात येते.

३) प्रस्तुतचे न्यायनिर्णयाविरुद्ध अपील दाखल झाल्यास जेव्हा केव्हा उच्च न्यायालय नोटीस देईल, तेव्हा न्यायालयासमोर उपस्थित राहण्याकरीता आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहीतेच्या कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम ₹१५,०००/– चे बंधपत्रासह जमानतपत्र द्यावयाचे आहे. सदरच्या जमानतपत्राचा अंमल सहा महिन्यांकरीता राहील.

४) प्रस्तुतचे निकालाची प्रमाणीत प्रत पिडीता हिला मोफत देण्यात यावी. तसेच प्रस्तुतचे निकालाची प्रमाणीत प्रत जिल्हा दंडाधिकारी, गडचिरोली यांना पाठविण्यात यावी.

Digitally signed by DNYANESHWAR MANOHAR AHER
Date: 2026.04.10 15:33:43 +0530

अहेरी.
दिनांक – १०/०४/२०२६.

**(ज्ञा.म. आहेर)**
विशेष न्यायाधीश (पोक्सो कायदा)
अहेरी.

## भाग 'क'

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार :

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सा.क्र.१ | पिडीता<br>(निशाणी क्र. १८) | पिडीता साक्षीदार |
| सा.क्र.२ | पिडीतेचे वडील<br>(निशाणी क्र.२२) | पिडीतेचे वडील |

### ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास :

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | **कोणी नाही.** | -- |

### क. न्यायालयाचे साक्षीदार, असल्यास :

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | **कोणी नाही.** | -- |

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाची निशाणी क्रमांकाची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | नि.क्र.२४ | शाळा सोडल्याचा दाखला (बचाव पक्षाने मान्य केला) |
| २. | नि.क्र.२५ | शाळेतील रजिस्टरचा उतारा (बचाव पक्षाने मान्य केला) |
| ३. | नि.क्र.२६ | घटनास्थळ पंचनामा (बचाव पक्षाने मान्य केला) |

### ब. बचाव पक्षातर्फे निशाणी क्रमांक :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | -- | -- |

### क. न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | -- | -- |

### ड. भौतिक वस्तू (Material Objects)

| अ.क्र. | भौतिक वस्तू क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | -- | -- |

Digitally signed by DNYANESHWAR MANOHAR AHER
Date: 2026.04.10 15:33:52 +0530

अहेरी.
दिनांक - १०/०४/२०२६.

**(ज्ञा.म. आहेर)**
विशेष न्यायाधीश (पोक्सो कायदा)
अहेरी.

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथन करते की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव :- विशेष न्यायालय तथा अतिरिक्त सत्र न्यायालय, अहेरी.

लघुखेकाचे (श्रेणी-२) नांव:- श्री. जे.एन. सावरकर.